**जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग**
मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, ओरोस-सिंधुदुर्गनगरी,
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, पिनकोड - 416 812
दुरध्वनी क्रमांक - 02362 - 228158, फॅक्स क्रमांक - 02362 - 228844
**संकेतस्थळ - www.sindhudurg.gov.in** **ईमेल- collroffice@gmail.com**

**आपत्ती व्यवस्थापन / अत्यंत महत्वाचे**

क्र. गृह/दुचाकी वाहने/कोरोना/2020
जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
दिनांक 31/03/2020

**वाचले** - 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 कलम 34
2) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 43, 56
3) साथरोग प्रतिबंधक कायदा 1897
4) मोटार वाहन अधिनियम 1988
5) या कार्यालयाकडील आदेश क्रमांक गृह.फौज.संहिता/144/2020 दिनांक 22/03/2020
6) या कार्यालयाकडील सुधारीत आदेश क्रमांक गृह.फौज.संहिता/कावि 85/144/2020 दिनांक 25/03/2020

**आदेश**

शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च, 2020 पासून लागू करुन खंड 2, 3 व 4 मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 आपल्या सिंधुदुर्ग जिल्हयासाठी लागू करण्यात आलेला असून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून सिंधुदुर्ग जिल्हयामधील **नागरी क्षेत्रातील** कोणत्याही रस्त्यावर सार्वजनिक वाहतूकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली याठिकाणी सर्व प्रकारची दुचाकी वाहनाचा वापर करण्यास दिनांक 31/03/2020 पासून पुढील आदेश होईपर्यंत प्रितबंध करण्यात येत आहे. सदर आदेशाचा भंग करणा-या व्यक्ती विरोधात कडक कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

तरी या आदेशान्वये सिंधुदुर्ग जिल्हयातील नागरी क्षेत्रात या आदेशाद्वारे आज दिनांक 31/03/2020 रात्री 12.00 वाजेपासून पुढील आदेश होईपर्यंत दुचाकी वाहतूकीच्या वापरास प्रतिबंध करण्यात येत आहे.

**सदर आदेश खालील बाबतीत लागू होणार नाही**

1. **शासकीय / निमशासकीय कर्मचारी यांची कर्तत्वावर असताना वापरली जाणारी खाजगी वाहने.**
2. **जिवनावश्यक वस्तू व सेवा यांची वाहतूक**
3. **प्रसार माध्यम व त्यांचे प्रतिनिधी**
4. **दवाखाने, वैद्यकीय केंद्र, औषधी दुकाने व आरोग्य विषयक सेवा पुरविणा-या आस्थापना**
5. **विद्यूत पुरवठा, ऑईल, पेट्रोलिमय व उर्जा संसाधने पुरविणा-या आस्थापना**

6. **अत्यावश्यक सेवा देणा-या आय.टी. आस्थापना.**
7. **प्रशासनाने / पोलीस विभागाने परवानगी दिलेल्या व्यक्ती**
8. **नागरी क्षेत्रात संबंधित मुख्याधिकारी यांनी जिवनावश्यक वस्तूंचा घरपोच पुरवठा (Home Delivery) करण्यासाठी प्राधिकृत केलेले व्यक्ती.**

(टिप- वर नमूद प्रमाणे सवलत दिलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांना कार्यालय प्रमुख यांनी दिलेले सही, शिक्याचे ओळखपत्र / नेमणुकीबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.)

तरी या आदेशावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

(के. मंजुलक्ष्मी)
जिल्हादंडाधिकारी सिंधुदुर्ग

प्रत
1) पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांजकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
2) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सिंधुदुर्ग यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
3)उपविभागीय अधिकारी (महसूल) सावंतवाडी / कुडाळ / कणकवली यांजकडे माहितीसाठी
4) तहसिलदार सर्व यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
5) मुख्याधिकारी (सर्व)
6) गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)